**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

## अपिल क्रमांक : के.आर-१६४९/२०२५

**अपिलार्थी, श्री.प्रविण माधवराव साळवे,**
**जी/१०, शालिमार गार्डन अपार्टमेंट,**
**बोटॅनिकल गार्डन, पोस्ट ऑफीस जवळ,**
**औंध रोड, पुणे ४११ ०२०.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी, जि.रत्नागिरी ४१५ ६१२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उत्तर रत्नागिरी, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी, जि.रत्नागिरी ४१५ ६१२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ७.११.२०२४ | --- | ११.१.२०२५ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.२२.४.२०२५ रोजीच्या अर्जान्वये "विहित मुदतीत माहिती दिलेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. गोविंद सटवाजी येवरीकर, उप अभियंता, (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (अपिलावरील सुनावणी आदेशानुसार केलेल्या कारवाईबाबत.)"

"(१. अपिलावरील सुनावणी अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार अपिलकर्त्यास पाठविलेल्या माहितीचे जावक नोंद वहीतील नोंद पानांची साक्षांकित प्रत मिळणेबाबत. २. अपिलिय अधिका-यांच्या अपिलावरील निर्णयानुसार अद्याप काहीही कारवाई केलेली नसल्यास जन माहिती अधिका-यांवर केलेल्या कारवाई पत्रांच्या साक्षांकित प्रती.)"

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "आजतागायत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना माहिती दिल्याबाबतचा कोणताही पुरावा आता त्यांच्याकडे उपलब्ध नाही. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राजीव कृष्णा मोहिते, उपविभागीय अभियंता (यां), यांत्रिकी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राजीव कृष्णा मोहिते यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (यां), यांत्रिकी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राजीव कृष्णा मोहिते, उपविभागीय अभियंता (यां), यांत्रिकी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ७.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चंन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राजीव कृष्णा मोहिते, उपविभागीय अभियंता (यां),
यांत्रिकी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी,
जि.रत्नागिरी ४१५ ६१२.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. गोविंद सटवाजी येवरीकर, उप अभियंता, (यांत्रिकी),
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रत्नागिरी,
जि.रत्नागिरी ४१५ ६१२ **यांचेमार्फत रवाना.**

**(विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सदरची नोटीस न बजाविल्यास त्यांना जबाबदार धरण्यात येईल).**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ